## दिनांक ०८.०४.२००९ रोजी संपन्न झालेल्या सिभेचे जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे कार्यवृत्त

जिल्हा उद्योग मित्र समितीची सन-२००९-१० या आर्थिक वर्षातील तसेच नव्याने रुजू झालेले मा. जिल्हाधिकारी, अकोला यांचे अध्यक्षतेखाली प्रथम सभा दि. ०८.०४.२००९ रोजी दुपारी ४.०० वाजता संपन्न झाली. सर्वप्रथम महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांनी मा. जिल्हाधिकारी, अकोला यांचे व उपस्थितांचे स्वागत करून मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने सभेस सुरूवात केली. व सर्वप्रथम ंअकोला जिल्हातील औद्योगिक विकासाबाबत सविस्तर माहिती सभागृहात सादर केली. सभेत खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

अ - दिनांक १५.१०.२००८ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीची सभेच्या कार्यवृतास सर्वानूमते मंजूरी प्रदान करण्यात आली

ब - दिनांक १५.१०.२००८ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेच्या कार्यवाही मुद्यावर चर्चा.

**प्रलंबीत मुद्ये.**

**कार्यवाही - १. ट्रान्सपोर्ट नगर.**
**मऔविमं.**

ट्रान्सपोर्ट नगर मधील विद्यूत पुरवठा संदर्भातील सर्व कामे पूर्ण झाली. असे संबंधित मऔविमं., चे अधिका-यांनी सभेत संगीतले. ट्रान्सपोर्ट नगरमध्ये सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या परंतू ट्रान्सपोर्टर ट्रान्सपोर्ट नगरमध्ये जात नाही. त्यामुळे शहरात अजूनही वाहतुकीची कोंडी होत असल्याची सभेत चर्चा झाली. तसेच औद्योगिक क्षेत्रात देखील इतरस्त्र ट्क उभे केले जातात. हयाबाबत संधटनेने सभेस अवगत केले. अशा ट्रान्सपोर्टर वर पोलीस विभागांनी कार्यवाही करण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. तसेच ट्रान्सपोर्टरला ट्रान्सपोर्ट नगरमध्ये जाण्याकरीता प्रोत्साहीत करण्याच्या सुचना मऔविमं. यांना दिल्या. तसेच अस्तितवात असलेल्या अध्यादेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी पोलीस विभागानी करण्याचे निर्देश दिले.

**कार्यवाही - २. मऔविमं.अकोला क्षेत्रातील (अप्पू चौक,लक्ष्मी वे ब्रीजपरीसरातील)**
**पोलीस विभाग. अतिक्रमण**

मऔविमं. अकोला क्षेत्रातील अप्पू चौक, लक्ष्मी वे ब्रीज परीसरातील अतिकमण काढण्याचा मुददा वारंवार चर्चेला येत असल्यामुळे मा. जिल्हाधिकारी महोदयांनी मऔविम अधिका-यांनी प्रत्यक्ष एसडीपीओ व संबधित ठाणेदारांशी प्रत्यक्ष संपर्क साधून आवश्यक फी चा भरणा करुन दिनांक ३०.४.२००९ पर्यत कार्यवाही पूर्ण करावी व त्याचा अहवाल संबधित विभागाला देण्यात यावा असे निर्देश कार्यकारी अभियंता मऔविम यांना देण्यात आले. तसेच मऔविमं.मार्फत सतत पाठपुरावा अजुन सुध्दा सहकार्य करीत नसल्यामळे मा. अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली. या संदर्भात मा.

**कार्यवाही - ३.** **मुर्तीजापूर औद्योगिक क्षेत्रात स्वतंत्र फिडर बाबत-**
**मराविविकं./मऔविमं.**

मुर्तीजापुर औदयोगिक क्षेत्रात ११ के.व्ही. स्वतंत्र फिडरच्या उभारणीचे व कार्यान्वीत करण्याचे काम पूर्ण झाले असून फक्त लोड कनेक्शनचे काम बाकी आहे. तसेच विद्यूत निरीक्षक व रेल्वे विभगाची नाहरकत प्राप्त झाली आहे. असे कार्यकारी अभियंता मराविविकं. ग्रामीण यांनी सभेत सांगीतले. यावर पुढील सभेपर्यंत सदर मुद्दा निकाली काढावा असे मा. अध्यक्षांनी संबंधितास निर्देश दिले.

**कार्यवाही - ४.** **उद्योग घटकांना नविन विद्युत पुरवठा-**
**मराविविकं.**

विद्युत कनेक्शन मिळण्याकरीता प्रलंबीत प्रकरणांची कार्यवाही पूर्ण करण्यांत आली

**विषय बंद**

**कार्यवाही - ५.** **मऔविमं. क्षेत्रात वाढते चोरीचे प्रमाण-**
**पोलीस विभाग**

अकोला औद्योगिक क्षेत्रात पोलीस चौकी नसल्याने, चोरीचे प्रमाण वाढले आहे. पोलीस विभागाकडून उद्योजकांना योग्य प्रतिसाद मिळत नाही. केलेल्या फिर्यादीची चौकशी सुध्दा होत नाही. असे औद्योगिक संघटनेने सभेत सांगीतले. यावर मा. अध्यक्षानी एसडीपीओ व सिव्हील लाईन पोलीस स्टेशन यांना उद्योजकांच्या सुरक्षाबाबत सुचना दिल्यात. तसेच मा.अध्यक्ष यांचे स्तरावरून मा. जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेशी चर्चा करण्यात येईल असे विषद केले.

**कार्यवाही - ६.** **फेज ४ एमआयडीसी मध्ये 11 K.V. नेटवर्क करण्याबाबत**.
**म.रा.वि.वि.क. /मऔविमं.**

उद्योजकांना भुखंड वितरीत केल्यानंतर उद्योजकांचे मागणी नुसार ११ KV चे जाळे तयार करण्यासंदर्भात निवीदा दिल्या असून, येत्या दिवसात निवीदाबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात येईत असे मऔविमं. अधिका-यांनी सभेत सांगीतले.

**कार्यवाही - ७.** **फेज ४ एमआयडीसी क्षेत्रात 33 K.V. चे सब-स्टेशन बाबत**.
**म.रा.वि.वि.क. /मऔविमं.**

फेज ४ एमआयडीसी क्षेत्रात अस्तितवात असलेली **11 K.V.** ची लाईन पूर्णतः वापरत असल्याने भविष्यात मागणी लक्षात घेवून त्या क्षेत्रात **33 K.V**.चे सब-स्टेशन आवश्यक आहे. याकरीता म.रा.वि.वि.क. चे यांनी मऔविमं. यांना ४ महिन्यापुर्वी प्रस्ताव सादर केलेला असून प्रकरण मऔविमं. कडे प्रलंबीत आहे. यावर सदर प्रकरण

**कार्यवाही - ८. कामगार नेत्यांकडून उद्योजकांना त्रास.**

औद्योगिक संघटनेशी चर्चा झाल्यानुसार कामगारांचे सुरक्षतेचेच प्रश्नांचीच नोंद सहायक कामगार आयुक्त तसेच सहसंचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांनी घ्यावी. त्यामुळे कामगारांचे प्रश्न निकाली काढता येतील. व पर्यायाने कामगार नेत्याकडून औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांचा त्रास कमी झाला. **विषय बंद.**

**कार्यवाही -९. फेज४औद्योगिक क्षेत्रातील भुखंडधारकांना ३१-१२-०९ पर्यत मुदतवाढविण्याबाबत मऔविमं.**

हयाबाबत मऔविमं. मुख्यालयाकडून सुचना प्राप्त झाल्या असून, ५ मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रादेशिक अधिकारी, मऔविमं. यांना आहे. यावर मा. अध्यक्षांनी प्रादेशिक अधिकारी, मऔविमं. यांना आपण याबाबत अनुकुल आहात काय असे विचारले असता, यावर प्रादेशिक अधिकारी, मऔविमं. यांनी अनुकुलता दर्शविली व उद्योजकांची भुखंडावर कामाची प्रगती पाहून मुदतवाढ देता येईल. असे प्रादेशिक अधिकारी, मऔविमं. यांनी सभेत सांगीतले.

## नवीन मुद्दे

**कार्यवाही -१. मऔविमं. क्षेत्रात होणा-या पाणी पुरवठयातील अनियमीतता व नियोजनाबाबत. मऔविमं.**

अकोला औद्योगिक क्षेत्रात पाणी पुरवठा नियमीत होत नाही याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली सध्या १८०० घनमिटर ऐवती १००० घनमिटर पणी पुरवठा होत असल्याचे सांगीतले. जून पर्यंत हा पाणी पुरवठा अत्यल्पच होईल असेही सभेत सांगीतले. कायमस्वरूपी पाणी पुरवठयाचा रू. ४२ कोटींचा प्रस्ताव मऔविमं. यांनी मुख्यालयास पाठविल्याचे सांगीतले. व त्यासाठी दोन वर्षाचा कालावधी लागू शकतो असेही विषद केले.

तसेच सन २००५ च्या पाणी टंचाई दुष्काळ परिस्थितीत उद्योजकांना बोरवेल करण्याची परवानगी मऔविमं. कडून देण्यात आली होती. व परिस्तिती सुधारल्यानंतर मऔविमं.नी बोरवेल बंद केले. असे संघटनेच्या प्रतिनिधींनी सभेत सांगीतले. तसेच उद्योजक मऔविमं. यांचे किमान भरण्यास तयार असल्याचेही विषद केले. यावर मा. अध्यक्षांनी सदर विषय त्यांचे स्तरावरून मऔविमं.हयांचे मुख्यालयास कळविण्यात येईल असे सांगीतले.

**कार्यवाही -२. ग्रोथ सेंटर ते शिवनी -शिवापुर गुडस् शेड मधील अप्रोच रोडबाबत. मऔविमं.**

ग्रोथ सेंटर ते शिवनी -शिवनी शेड मधील अप्रोच रोड बनविण्याबाबतचा प्रस्ताव तयार करून ४ महिन्यापुर्वी मऔविमं., नियोजन विभाग, मुंबई यांना सादर करण्यात आला असून, अद्याप पावेतो त्यास मंजुरी मिळालेली नाही. असे मऔविमं. अधिका-यांनी सभेत

**<u>कार्यवाही</u> -३. ग्रोथ सेंटर मऔविमं-४ मधील अजय इंडस्ट्रीज भाडयाने दिल्या बाबत.**
**<u>मऔविमं</u>.**

ग्रोथ सेंटर मधील अजय इंडस्ट्रीज या घटकाने मसाला उद्योगकरीता घेतलेला भुखंड स्टील भांडी तयार करणा-या इसमास भाडयाने दिला असून आजू-बाजूच्या लघु उद्योजकांना त्याचा त्रास होत आहे. अशी सभेत चर्चा झाली. या संदर्भात प्रादेशिक अधिकारी मऔविमं. द्वारे पुढील कार्यवाही करण्यांत येईल असे सांगीतले.

**<u>कार्यवाही</u> -४. मऔविमं क्षेत्रातील उद्योजकांना मनपाच्या जकात विभागाचे प्रतिनिधी कडून मारहाण.**
**<u>मनपां</u>.**

मऔविमं क्षेत्रातील उद्योजकांना मनपाच्या जकात विभागाचे प्रतिनिधी द्वारे मारहाण झाल्याचे औद्योगिक संघटनेने कळविले आहे. हया संदर्भात अकोला महानगर पालीका यांनी संबंधितावर कठोर कार्यवाही करून चेक पोष्टवर नियंत्रण ठेवण्याचे कळविले आहे. यावर सभेत सविस्तर चर्चा झाली असता, जकात वसूली करणा-यांकडे बॅच नाही, आय कार्ड नाही, युनिफार्म नाही, असे सभेत सांगीतले.

अकोला महानगर पालीकाने पे-रोलवर असलेल्या कर्मचा-यांची यादी असोसिएशनला द्यावी अशी मागणी असोसिएशन सभेत केली. ज्या उद्योजकास मारहाण झाली त्याचा FIR पोलीस विभागाने दाखल केला नसल्याची बाब औद्योगिक संघटनेने सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली ही बाब गंभीर असून, मनपा यांनी त्वरीत संबंधितावर कार्यवाही करण्याची सुचना मा.अध्यक्षांनी दिल्या. तसेच कर्मचा-यांना ओळख पत्र व युनिफार्म एक महिन्याचे आंत पुरविण्यांत येईल असे उपायुक्त मनपा यांनी सभेत सांगीतले.

**<u>कार्यवाही</u> -५. सामुहीक प्रोत्साहन योजना-२००१ बाबत.**
**<u>जिउके</u>**

सामुहीक प्रोत्साहन योजना - २००१ उद्योजकांना अनुदान मिळण्याकरीता अंतिम परिणाम कारक टप्पे पूर्ण करण्याची मुदत ३१-०३.०८ होती. परंतू काही उद्योजक मऔविमं. हयांची Intrest Free Loan योजना बंद झाल्याने तसेच अकोला येथे पाण्याची टंचाई असल्याने उद्योजक आवश्यक अंतिम टप्पे पूर्ण करू शकले नाही अशा उद्योजकांना या योजनेत मुदतवाढ देण्याची औद्योगिक संधटनेने विनंती केली. यावर महाव्यवस्ापिक यांनी सदर बाब धोरणात्मक असल्याने संघटनीची विनंती मुख्यालयास कळविण्यात येईल असे सभेत सांगीतले.

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव

## दिनांक ०८.०४.२००९ रोजी संपन्न होणा-या आजारी उद्योग समिती सभेचे कार्यवृत्त

**कार्यवाही - १.** **में. अक्षय केमिकल्स या घटकाच्या पुर्नवसनाबाबत.**
**SBI, OLD CITY.**

में. अक्षय केमिकल्स या घटकाने त्याच्या उद्योगाचे पुर्नवसनाबाबतचा प्रस्ताव भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया, जुने शहर, शाखा अकोला यांचे कडे परस्पर सादर केला होता. त्यानंतर घटकाने या कार्यालयाने सदर प्रस्तावाबाबत अर्ज सादर केला आहे. घटकाने बँकेकडून नर्सिग प्रोग्राम मंजुर करण्याकरीता विनंती केली आहे. या विषयावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. सभेत उपस्थित SBI, OLD CITY. शाखेचे व्यवस्थापक, यांनी सांगीतले की, सदर घटकाचे खाते NPA झाले आहे. तसेच सदर घटकाचा पुनर्वसनाचा प्रस्ताव त्यांच्या वरिष्ठ कार्यालयास पाठविला होता परंते सदर प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाने नामुंजूर केल्याचे सभेत सांगीतले. त्यामुळे सदर बाब जिल्हास्तरावर कार्यवाही करणे शक्य आह`या संदर्भात दि. १६-०४-०९ रोजी राज्यस्तरीय SLIIC, सभा मुंबई येथे असल्याचे संबंधिताने सभेत सांगीतले.

**जिल्हास्तरावरील विषय बंद करण्यात आला.**